(राघो नारायण सावंत विरुध्द उमाजी विश्राम सावंत व.१०)

**:–नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ११६/२०१८ मधील नि. ३८ वरील आदेश –:**

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ सुमती विश्राम सावंत ही दिनांक ०५/११/२०२३ रोजी मयत झालेली असून त्यांना प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ हे त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी असून त्याचे व्यतिरिक्त तिला अन्य कोणीही कायदेशीर प्रतिनिधी नाहीत. सबब तशी दुरुस्ती या दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये करण्यास वादी यास परवानगी असावी अशी विनंती वादीने केली आहे.

०२. प्रतिवादीने सदर अर्जावरच आपले म्हणणे देऊन सदर अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले की सदर कामात दिलेला अर्ज हा कायदेशीर तरतुदीप्रमाणे नाही. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज, म्हणणे वाचून पाहिले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. वादीने सदरचा दावा, सरसनिरस धडेवाटप होऊन कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ४ सुमती विश्राम सावंत ही दिनांक ०५/११/२०२३ रोजी मयत झालेली असून त्यांना प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ हे त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *"दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते."*

**०५.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ ही दिनांक ०५/११/२०२३ रोजी मयत झाली आहे. प्रस्तुतचा दावा, सरसनिरस धडेवाटप होऊन कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादी क्र. ४चे वारस देखील सदर दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादीचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मुदतीत दाखल करण्यात आलेला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: आदेश :–**

१. नि. ३८ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ४चे कायदेशीर वारसांबाबत अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.04.16 19:57:26 +0530

दिनांक– १६/०४/२०२४

(प.रा.ढोरे )
सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.